पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर-४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur -Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

ईमेल : registrar@sus.ac.in संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in ✆ ०२१७-२७४४७७६ (विस्तारीत क्रमांक : १०५)

**कुलसचिव कार्यालय (Registrar Office)**

जावक क्र : पुअहोसोविसो/अबक/१५३१

दिनांक : 15 MAY 202

## जाहीर आवाहन

**प्रति,**
**मा.प्राचार्य**
सर्व संलग्नित महाविद्यालय,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ सोलापूर

**प्रति,**
**मा.संचालक**
सर्व संकुल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ परीसर

**विषय:- महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त खुली निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्याबाबत..**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ अंतर्गत महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्या वतीने दि.१५/०५/२०२४ ते दि.२५/०५/२०२४ या कालावधीमध्ये महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त "महात्मा बसवेश्वर यांचे जीवन, विचार आणि कार्य" यावर प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने, खुली निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. सदर निबंध स्पर्धा ही सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ संकुलांसाठी तसेच सर्व नागरिकांसाठी खुली आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम पारितोषिक रु.२०००/-, द्वितीय पारितोषिक रु.१५०१/-, तृतीय पारितोषिक रु.१००१/-, तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक रु.५०१/-, अशी रोख रक्कम व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तरी सदरील निबंध स्पर्धेची माहिती सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील संकुलांतील विद्यार्थी, अभ्यासक, नागरिक यांना निर्दशनास आणून जास्तीत जास्त स्पर्धकांना भाग घेण्यास प्रोत्साहित करावे, ही विनंती.

धन्यवाद.

आपली स्नेहांकित,

(योगिनी घारे)
कुलसचिव

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

## महात्मा बसवेश्वर अध्यासन

## महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त खुली निबंध स्पर्धा.

➢ **स्पर्धेचे नियम व अटी**

१. सदर निबंध स्पर्धा सर्वांसाठी खुली असून यास कोणतीही वयोमर्यादा नाही.

२. सदर निबंध स्पर्धा मराठी भाषेत असेल.

३. निबंध स्पर्धेची शब्दमर्यादा २५०० ते ३००० शब्द असेल.

४. निबंध स्पर्धेचा विषय महात्मा बसवेश्वर यांचे जीवन विचार आणि कार्य या संलग्नित विविध पैलूवर आधारित असेल.

५. सर्व स्पर्धकांनी लिहिलेले निबंध हे स्वलिखित व संशोधनावर आधारित असावे.

६. स्पर्धाकांनी आपले निबंध दि.२५/०५/२०२४ पर्यंत **mbchair@sus.ac.in** या ई - मेलवर पाठवावे किंवा समक्ष पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र, सामाजिक शास्त्रे संकुल इमारत, खोली क्रमांक ७ येथे जमा करावेत.

७. बक्षीस स्वरुप रोख रक्कम व प्रशस्तीपत्रक असेल.

८. सदर स्पर्धेमध्ये परिस्थितीनुरुप काही बदल झाल्यास ते कळविण्यात येतील.

९. सदर नियम व अटी सर्व स्पर्धकांना लागू राहतील.

(योगिनी घारे)
कुलसचिव